# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय

४१२, ई शिवाजीनगर पुणे - ४११ ०१६

☎ :२५६५६२३४ फॅक्स २५६५६२३४ E-Mail : ropune.dte@gmail.com

जा.क्र.विकापु/आस्था-१ /२०१९/ 2910 दिनांक : 16 JUL 2019

प्रति,
प्राचार्य
सर्व शासकीय पदविका संस्था

विषय – महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा गट अ या संवर्गातील प्राचार्य, विभागप्रमुख व अधिव्याख्याता पदावर नियुक्त्या दिलेल्या उमेदवारांचे वैद्यकीय व चारित्र्य प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र, अपंग प्रवर्गातून नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारांचे अपंगत्व प्रमाणपत्राची पडताळणी करणेबाबत ...

संदर्भ - मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र.४३अ/आस्था/२०१९/३१७ दिनांक १७/०६/२०१९

उपरोक्त संदर्भिय मा.संचालक यांचे पत्राचे अवलोकन करावे. आपल्या संस्थेतील ज्या उमेदवारांच्या नियुक्त्या महाराष्ट्र तंत्रनिकेतन,शिक्षक सेवा गट अ या संवर्गात सन २०१७ ते आजपर्यंत प्राचार्य, विभागप्रमुख व अधिव्याख्याता या पदावर वैद्यकीय व चारित्र्य प्रमाणपत्र, जातपडताळणी प्रमाणपत्र व अपंग प्रवर्गातून नियुक्ती केलेल्या उमेदवारांचे अपंगत्व प्रमाणपत्र आयुक्त अपंग कल्याण, पुणे यांचेकडून ६ महिन्याच्या आंत पडताळणी करुन घेण्याच्या अटींच्या अधीन राहून करण्यात आलेली आहे , अश्याच अध्यापकांची माहिती खालील विवरणपत्रांत तयार करावी. तसेच सदर माहितीची **हार्ड कॉपी आवश्यक त्या सर्व सांक्षाकित प्रमाणपत्रासह (व्दिप्रतीत) या कार्यालयांस दिनांक २३/०७/२०१९ पर्यंत न चुकता सादर करावी .**

| अ.क्र. | अध्यापकांचे पुर्ण नांव | पदनांम | नियुक्ती आदेश क्र. व दिनांक | कोणत्या अटींचे आधीन राहून नियुक्ती करण्यात आलेली आहे | अटींची पुर्तता झालेली आहे काय? **(सोबत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक)** | अटीची पुर्तता झालेली नसल्यास त्याबाबतचे कारण |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ |
| | | | | | | |

माहिती तयार करतांना ती Ms-excel–DV-TTNatraj मध्ये तयार करुन सदर excel file est.ropune@gmail.com या मेलआयडीवर मेल करावी.

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- १) संगणक विभाग यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

Endorsement

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, *महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक* १९६७, *मुंबई* ४०० ००१.

दूरध्वनी - ०२२. ३०२३३४७३/४२४/४३४,

E-mail : desk4a@dtemaharashtra.gov.in Internet : http//www.dtemaharastra.gov.in


स्मरणपत्र

क्रमांक : ४अ/आस्था/२०१९/३१७

दिनांक : 17 JUN 2019

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर, औरंगाबाद, अमरावती,
नाशिक, पुणे, मुंबई

विषय : महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा गट अ या संवर्गातील प्राचार्य, विभागप्रमुख व अधिव्याख्याता पदावर नियुक्त्या दिलेल्या उमेदवारांचे वैद्यकीय व चारित्र्य प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र, अपंग प्रवर्गातून नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारांचे अपंगत्व प्रमाणपत्राची पडताळणी करणे.

संदर्भ : १) शासन पत्र क्र. ससेनि-३२१९/प्र.क्र.३२/१९/तांशि-७ दि. १३-०३-२०१९ व १४-०३-२०१९
२) संचालनालयाचे पत्र क्र. ४अ/आस्था/२०१९/१८९ दि. २३-०४-२०१९

महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा गट अ या संवर्गात सन २०१५ ते आजपर्यंत प्राचार्य, विभागप्रमुख व अधिव्याख्याता पदावर नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत. सदर नियुक्त्या करतांना काही उमेदवारांच्या नियुक्त्या वैद्यकीय व चारित्र्य प्रमाणपत्र, जातपडताळणी प्रमाणपत्र व अपंग प्रवर्गातून नियुक्ती केलेल्या उमेदवारांचे अपंगत्व प्रमाणपत्र आयुक्त अपंग कल्याण, पुणे यांचेकडून पडताळणी ६ महिन्याच्या आत करून घेण्याच्या अटीच्या अधीन करण्यात आलेल्या आहेत. ज्या उमेदवरांची नियुक्त्या अटींच्या अधीन राहून करण्यात आलेल्या आहेत सदर उमेदवारांचे उक्त नमूद केलेले प्रमाणपत्र सादर करण्याबाबत संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये शासनाने निर्देशित केलेले आहे.

शासन पत्रातील निर्देश विचारात घेवून संदर्भ क्र. २ च्या संचालनालयाच्या पत्रान्वये आपल्या अधिपत्याखालील शासकीय तंत्रनिकेतनात ज्या उमेदवारांची नियुक्त्या महाराष्ट्र तंत्रनिकेतन, शिक्षक सेवा गट अ या संवर्गात सन २०१५ ते आजपर्यंत प्राचार्य, विभागप्रमुख व अधिव्याख्याता या पदावर उक्त अटींच्या अधीन करण्यात आलेल्या आहेत, त्या सर्व उमेदवारांची माहिती संचालनालयास सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. सदरची माहिती अद्यापही उपलब्ध झालेली नाही. तरी सदरची माहिती तात्काळ उपलब्ध करून द्यावी. (माहितीची प्रत desk4a@dtemaharashtra.gov.in वर पाठवावी)

(प्रमोद नाईक)
सहसंचालक, तंत्र शिक्षण,
महाराष्ट्र राज्य ,मुंबई

प्रत : १) मा. सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
२) प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतने.

\\१९२.१६८.१.९\desk४a\Priya\R O Letter (Repaired).docx


तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
17 JUN 19
आवक क्र. 5827